वर्ष : १३९
केसरी
पुणे, शनिवार, दि. ११ जुलै २०२६

# 'फ्युएल'तर्फे उद्या 'माऊली-एक कालातीत परंपरा' भारतनाट्यम कार्यक्रम

**पुणे :** भक्ती, परंपरा, कला व ईश्वर यांच्यातील कालातीत संबंधाचा उत्सव म्हणजे ' माऊली-एक कालातीत परंपरा' आहे. पंढरपूर वारीचा आत्मा जिवंत करणारी ही कला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम कलाकार, नृत्यदिग्दर्शक आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांच्या भरतनाट्यमचा कार्यक्रमातून पुणेकरांना अनुभवता येणार आहे. हा कार्यक्रम उद्या (रविवारी) मयूर कॉलनी येथील एमईएस सभागृहात सायंकाळी ५ वाजता होणार आहे. फ्युएल शिक्षण संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नृत्यांगणा, भरतनाट्यम कलाकार, नृत्यदिग्दर्शक आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर, फ्युएलच्या विभागप्रमुख प्रा. प्राची अहिरराव आणि चंद्रशेखर उपस्थित होते.

डॉ. केतन देशपांडे यांनी सांगितले की, सीएसआरच्या माध्यमातून मोफत शिक्षण देणाऱ्या फ्युएल शैक्षणिक संस्थेतील १० मुलींच्या शिक्षणाला सहाय्य करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बाला देवी चंद्रशेखर या संतांच्या अभंगांच्या ओव्या एकसंधपणे जोडून संपूर्ण वारकरी सांप्रदायाचा प्रवास रंगमंचावर साकार करणाऱ्या पहिल्या नृत्य कलाकार आहेत. वारकरी परंपरेतील अभंग आणि तत्वचिंतनात्मक वाणी यांमधून प्रेरणा घेऊन त्या प्रत्येक भक्तिगीताला एक जिवंत, अखंड यात्रेत रुपांतरित करतात. बाला देवी चंद्रशेखर यांनी ४० पेक्षा अधिक देशांमध्ये ३०० पेक्षा जास्त जागतिक मंचांवर भारतीय शास्त्रीय नृत्य सादर केले आहे.

कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर म्हणाल्या, 'माऊली-अ टाइमलेस ट्रेडिशन' ही संकल्पना पवित्र वारीतून प्रेरणा घेते. वारी ही तीर्थयात्रा नाही तर तो अंतर्मनाचा प्रवास आहे. माऊली मध्ये या प्रवासाची परिणती एका परिवर्तनात होताना दिसते. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि संत जनाबाई यांसारख्या वारकरी संतांचे जीवन आणि त्यांचे अभंग भरतनाट्याच्या माध्यमातून साकार करुन हा प्रवास उलगडला जाणार आहे.